# वाया जाणारे पाणी अडवून जिरवल्याने पातळीत वाढ

**उपक्रम** | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम, अठरा एकरातील वाया जाणाऱ्या पाण्याचा रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे केला पुनर्वापर

प्रतिनिधी | चिखली

अठरा एकरांच्या परिसरातील वाया जाणारे पाणी एकत्र करून पुनर्वापराचा प्रयोग चिखलीतील शिवाजी विद्यालयाने राबवला आहे. यामुळे कॅम्पसमधील पाणी परिसरात मुरवले जात आहे. भविष्यात त्यामुळे परिसरातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल व पाण्याच्या बचतीचा संदेश विद्यार्थ्यांसह जनसामान्यांत पोहोचले, असा दृष्टिकोन या मागे आहे.

दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत असल्याने सर्वांनाचा पाणीटंचाईच्या झळांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर चिखली शहरातील शिवाजी विद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात एक अभिनव उपक्रम राबवला आहे. यामुळे महाविद्यालय तसेच परिसरात पडणारे पाणी जमिनीत जिरवून पाणी पातळी वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. चिखलीचे शिवाजी कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय १८ एकर परिसरावर आहे. यामध्ये पडणारे पावसाचे पाणी, वळणाचे पाणी, छतावर पडणारे पाणी एका ठिकाणी एकत्र केले आहे. हे पाणी पाइपच्या माध्यमातून एका खड्ड्यात सोडले जात आहे. या खड्ड्यात साठवलेले पाणी महाविद्यालय परिसरात शोष खड्डे तयार करून जिरवले जात आहे.

## पाणी जिरवण्याचे कार्य

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व दुष्काळात चांगलेच कळाले. २०१३ हे जलवर्ष म्हणून साजरे होतेय. या माध्यमातून महाविद्यालय परिसरात पडणारे सर्व पाणी एकत्र करून त्याचा पुनर्वापर करत आहे. पाणी जिरवण्यासाठी शोष खड्डे तयार करून जास्तीत जास्त पाणी जिरवल्यास परिसरातील पाणी पातळीत वाढ होईल.

**नीलकंठ भुसारी,** प्राचार्य शिवाजी विद्यालय.



शिवाजी महाविद्यालयात जलपुनर्भरण प्रकल्प राबवण्यात आला असून, १८ एकर परिसरातील पावसाचे पाणी या खड्ड्यात साचवण्यात येते.

दैनिक दिव्य मराठी 21/09/2013